25 APR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक उपेक्षित महात्मा' या पुस्तकाचे प्रकाशन सरोज पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डावीकडून राजन गवस, माणिकराव साळुंखे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, टी. एस. पाटील, रणधीर शिंदे उपस्थित होते.

# महर्षी शिंदे क्रांतिकारी लोकोत्तर व्यक्तिमत्त्व

## डॉ. राजन गवस यांचे प्रतिपादन

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २४ : 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे क्रांतिकारी लोकोत्तर व्यक्तिमत्त्वाचे धनी होते. त्यांनी अस्पृश्यता निवारणाचे अंगीकृत कार्य करताना स्वकीयांकडूनच अपमान, अवहेलना आणि उपेक्षा झेलली. मात्र, ते सदैव निरपेक्षवृत्तीने कार्य करीत राहिले', असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी आज येथे केले.**

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे शिंदे यांच्या जयंतीनिमित्त ज्येष्ठ विचारवंत दिवंगत प्रा. एन. डी. पाटील लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक उपेक्षित महात्मा' या पुस्तकाचे प्रकाशन सरोज पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

'एन. डी. पाटील यांच्यामध्ये एक कवी दडलेला होता. त्या अंगाने त्यांनी महर्षी शिंदे यांना शापित म्हटले. त्यांनी महर्षींना केंद्रस्थानी ठेवून महाराष्ट्राच्या प्रबोधन परंपरेचे यथायोग्य मापन करण्याचे महत्त्वाचे काम केले. एका रात्रीत लिहिलेल्या या पुस्तकाच्या माध्यमातून ते आता वाचकांसमोर येत आहे, याचा आनंद मोठा असल्याचे डॉ. गवस यांनी सांगितले.

यावेळी सरोज पाटील म्हणाल्या, 'एन. डी. पाटील यांनी सुरुवातीपासून आपल्या मूल्यांना प्राणापलीकडे जपले. त्यांच्याशी जुळवून घेताना प्रारंभी दमछाक झाली. मात्र, त्या मूल्यांशी तडजोड करण्याचा विचार कधी मनी आला नाही. हेच मूल्य संस्कार मुलांनीही आत्मसात करून पुढे चालविले आहेत. यापेक्षा मोठे सुख आणि समाधान दुसरे असू शकत नाही. जगभरात जी माणसे मोठी झाली, त्यांच्यापाठी ठाम उभ्या राहणाऱ्या त्यांच्या अर्धांगिनींचीही समाजाने सकारात्मक दखल घ्यावी.'

याप्रसंगी माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, प्राचार्य टी. एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. 'अरिष्ट काळाचे भयसूचन' या पुस्तकाला शासनाचा केशवसुत पुरस्कार मिळाल्याबद्दल एकनाथ पाटील यांचा डॉ. साळुंखे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. यावेळी श्रीकृष्ण महाजन, सुरेश शिपूरकर, प्रभंजन माने, अवनीश पाटील, मेघा पानसरे, प्रसाद कुलकर्णी, व्यंकाप्पा भोसले, गिरीश मोरे, भारती पाटील, नामदेव कांबळे, सिंधू आवळे, रघुनाथ कडाकणे, किसन कुराडे उपस्थित होते. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

### अध्यासनांनी योगदान द्यावे

■ कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'विद्यापीठामधील विविध अध्यासनांनी धोरण निर्मितीमध्ये योगदान देण्यासाठी पुढे येणे अपेक्षित आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विविध संशोधन प्रकल्पांची यादी करून टप्प्याटप्प्याने त्यांच्यावर काम सुरू करावे.'

25 APR 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मस्ट READ

# महर्षी शिंदे क्रांतिकारी लोकोत्तर व्यक्तिमत्त्व

## राजन गवस : महर्षींवरील पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे क्रांतिकारक लोकोत्तर व्यक्तिमत्त्वाचे धनी होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी गुरुवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने शिंदे यांच्या जयंतीनिमित्त ज्येष्ठ विचारवंत प्रा. एन. डी. पाटील लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक उपेक्षित महात्मा' या पुस्तकाचे प्रकाशन सरोज पाटील यांच्या हस्ते केले. त्यावेळी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. माजी कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे, प्राचार्य टी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.



विद्यापीठात 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक उपेक्षित महात्मा'च्या प्रकाशनप्रसंगी डॉ. राजन गवस, डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. सरोज पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. टी. एस. पाटील, डॉ. रणधीर शिंदे उपस्थित होते.

डॉ. राजन गवस म्हणाले, महर्षी शिंदे यांनी अस्पृश्यता निवारणाचे अंगीकृत कार्य करीत असताना स्वकीयांकडूनच अपमान, अवहेलना आणि उपेक्षा झेलली. मात्र, ते सदैव निरपेक्ष वृत्तीने कार्य करीत राहिले. म्हणूनच प्रा. एन. डी. पाटील यांनी त्यांच्या कार्याला एकतारीवरचे गाणे म्हटले.

डॉ. सरोज पाटील म्हणाल्या, एन. डी. पाटील यांनी सुरवातीपासून आपल्या मूल्यांना प्राणापलीकडे जपले. त्यांच्याशी जुळवून घेताना प्रारंभी दमछाक झाली, मात्र, त्या मूल्यांशी तडजोड करण्याचा विचार कधी मनी आला नाही. हेच मूल्यसंस्कार मुलांनीही आत्मसात करून पुढे चालविले आहेत.

कुलगुरू डॉ. शिर्के, डॉ. माणिकराव साळुंखे, प्रा. टी. एस. पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. रणधीर शिंदे, सुखदेव एकल, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, सुरेश शिपूरकर, डॉ. प्रभंजन माने, डॉ. अवनीश पाटील, डॉ. मेघा पानसरे, प्रसाद कुलकर्णी, व्यंकाप्पा भोसले, डॉ. गिरीश मोरे, डॉ. भारती पाटील, नामदेवराव कांबळे, डॉ. सिंधू आवळे, डॉ. रघुनाथ कडाकणे, किसन कुराडे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

25 APR 2025

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची इमारत 'अर्थ-डे' वर झळकली

## जगातील नऊ इमारतींचा समावेश : विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनन्सचाही समावेश


प्रतिनिधी
कोल्हापूर

जागतिक वसुंधरा दिनाच्या पूर्वसंध्येला जगातल्या महत्वाच्या बिल्डिंग हिरव्या प्रकाशात झळकल्या. त्यांची यादी ऑफिशियल 'अर्थ-डे' यांनी लिंक इन वर फोटोसहीत पोस्ट केली आहे. यात शिवाजी विद्यापीठाच्या इमारतीचाही समावेश आहे. विशेष म्हणजे 'अर्थ-डे' वर जगातील नऊच इमारती झळकल्या असून यात महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस व शिवाजी विद्यापीठाची इमारत या दोनच इमारतीचा समावेश आहे.

विद्यापीठाच्या इमारतीला जगातील महत्वाच्या बिल्डिंगच्या यादीत स्थान मिळाल्याने विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. शांघाय येथील मार्सीडिज बेन्झ अरीना, मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज ट र्मिनस, पोर्तुगल येथील स्यांचुरी ऑफ ख्रिस्त द किंग, न्यूयॉर्क येथील वन वर्ल्ड ट्रेड सेंटर, दिल्ली येथील सेंट जेम्स चर्च, पोलंड येथील वर्सोवा, कराची येथील फ्रेअरे हॉल, स्कॉटलंड येथील ओ वो हायड्रो अरीना व कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठ इमारत अशा जगातील ९ इमारती 'अर्थ-डे' वर झळकल्या आहेत.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 APR 2025
सकाळ



# 'अर्थ डे'च्या जागतिक यादीत विद्यापीठ झळकले

कोल्हापूर, ता. २४ : जागतिक वसुंधरा दिनाच्या पूर्वसंध्येला जगातील महत्त्वाच्या इमारती हिरव्या प्रकाशात उजळून निघाल्या. त्यांची यादी ऑफिशयल अर्थ डे यांनी लिंक इनवर छायाचित्रासहीत पोस्ट केली. त्यात शिवाजी विद्यापीठाचा समावेश आहे. अनेक महत्त्वाच्या इमारती हिरव्या रंगाच्या प्रकाशात उजळून काढण्याचा हा उपक्रम पर्यावरणाचे महत्त्व आणि पृथ्वीचे रक्षण करण्याच्या उद्देशाने आयोजित केला होता. या उपक्रमात सहभागी झालेल्या इमारतींची यादी 'अर्थ डे'ने प्रसिद्ध केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 APR 2025
पुढारी



# शिवाजी विद्यापीठाची इमारत 'अर्थ डे'वर झळकली

## कोल्हापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**


जागतिक वसुंधरा दिनाच्या पूर्वसंध्येला जगातल्या महत्त्वाच्या बिल्डिंग हिरव्या प्रकाशात झळकल्या. त्यांची यादी ऑफिशियल अर्थ डे यांनी लिंक इन वर छायाचित्रासह पोस्ट केली आहे. यात शिवाजी विद्यापीठाच्या इमारतीचा समावेश आहे. विद्यापीठाच्या इमारतीला जगातील महत्त्वाच्या बिल्डिंगच्या यादीत स्थान मिळाल्याने विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

जागतिक वसुंधरा दिनानिमित्त देशासह जगभरातील इमारतीवर हिरव्या रंगाच्या आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. याचे छायाचित्र मंगळवारी प्रसिद्ध झाले होते. याची दखल 'अर्थ डे' या जागतिक स्तरावरील संस्थेने घेतली.

विशेष म्हणजे 'अर्थ डे'वर जगातील नऊ इमारती झळकल्या आहेत. यात महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस व शिवाजी विद्यापीठ इमारतीचा समावेश आहे. शांघाय येथील मार्सीडेज बेन्झ अरीना, मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, पोर्तुगल येथील सेंचुरी ऑफ ख्रिस्त द किंग, न्यूयॉर्क येथील वन वर्ल्ड ट्रेड सेंटर, दिल्ली येथील सेंट जेम्स चर्च, पोलंड येथील वर्सोवा, कराची येथील फ्रेअरे हॉल, स्कॉटलंड येथील ओ वो हायड्रो अरीना व कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठ इमारत अशा जगातील नऊ इमारतींचा यात समावेश आहे.

25 APR 2025 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# शिवाजी विद्यापीठाची इमारत 'अर्थ डे'वर

## जगातील नऊ इमारतींचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जागतिक वसुंधरा दिनाच्या पूर्वसंध्येला जगातल्या महत्त्वाच्या बिल्डिंग हिरव्या प्रकाशात झळकल्या. त्यांची यादी ऑफिशियल अर्थ डे यांनी फोटोसहित पोस्ट केली असून यात शिवाजी विद्यापीठाच्या इमारतीचाही समावेश आहे. विशेष म्हणजे अर्थ डे वर जगातील नऊच इमारती झळकल्या असून यात महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस व शिवाजी विद्यापीठाची इमारत या दोनच इमारतींचा समावेश आहे. विद्यापीठाच्या इमारतीला जगातील महत्त्वाच्या बिल्डिंगच्या यादीत स्थान मिळाल्याने विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

शांघाय येथील मर्सिडेज बेन्झ अरीना, मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल, पोर्तुगाल येथील स्यांचुरी ऑफ ख्रिस्त द किंग, न्यूयॉर्क येथील वन वर्ल्ड ट्रेड सेंटर, दिल्ली येथील सेंट जेम्स चर्च, पोलंड येथील वॉर्सा, कराची येथील फ्रेअरे हॉल, स्कॉटलंड येथील ओ वो हायड्रो अरीना व शिवाजी विद्यापीठ इमारत अशा जगातील ९ इमारती अर्थ डे वर झळकल्या आहेत.

25 APR 2025 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# भगवान महावीर अध्यासनातून उलगडणार जैन धर्माचे तत्त्वज्ञान

## शिवाजी विद्यापीठात होणार उभारणी : प्रयोगातून मानवी मूल्यांची पायाभरणी

पोपट पवार
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सायंकाळी सहाच्या आत जेवण करा, जे आवश्यक आहे तेवढे घ्या, नको ते दुसऱ्यांना द्या, जीवनशैलीत कमीत कमी वस्तूंचा वापर करा हे जैन धर्माचे तत्त्वज्ञान जगभरातील नागरिकांसाठी कौतुकाचा विषय असला तरी आता हेच तत्त्वज्ञान अगदी पुराव्यानिशी संशोधन करून तौलनिकदृष्ट्या शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनातून मांडले जाणार आहे. महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित नूतन इमारतीचे भूमिपूजन नुकतेच करण्यात आले. या अध्यासनाची ही केवळ इमारत उभी राहत नाही तर मानवी मूल्यांच्या तत्त्वज्ञानाचा पाया यानिमित्ताने रचला जाणार आहे.

विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव अध्यासनाजवळच विद्यापीठाने या इमारतीसाठी जागा दिली असून, दोन मजली इमारतीसाठी १३ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक तयार केले आहे. यासाठी इमारत निधी समितीने एक कोटी ११ लाख रुपयांचा निधी देणगी स्वरूपात जमा केला. याच निधीतून पहिल्या टप्प्याचे काम करण्यात येणार आहे. या इमारतीत सभागृह, ग्रंथालय, संशोधकांसाठी खोल्या यासह विविध सुविधा असतील. उर्वरित कामासाठी शासनाकडे निधीची मागणी अध्यासनाने केली असून, तो निधी मिळाल्यानंतर पुढील काम करण्यात येणार आहे.



### जागतिक दर्जाचे ध्यानकेंद्र

सध्या स्पर्धेच्या युगात अनेकजण ताणतणावाखाली आहेत. त्यामुळे ध्यानधारणा करणे क्रमप्राप्त बनले आहे. समाजाची ही गरज ओळखून या अध्यासनामार्फत जागतिक दर्जाचे ध्यानकेंद्र उभारणार आहे.

### तौलनिक संशोधनावर भर

जैन धर्माचे तत्त्वज्ञान आणि इतर धर्मांचे तत्त्वज्ञान यांचे तौलनिक संशोधन, अभ्यास या केंद्राच्या वतीने करण्यात येईल. जैन धर्माचा बौद्धिक दृष्टिकोन लक्षात घेऊन संशोधनात्मक लेखन, शिवाय तत्त्वज्ञानाची ओळख होण्यासाठी सोप्या भाषेतील साहित्य प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

### त्या ७४ ग्रंथांचा होणार अभ्यास

जैन धर्मात ७४ ग्रंथ आहेत. या ग्रंथांचा बारकाईने अभ्यास करून धर्माची चिकित्सा करण्यात येणार आहे. धर्मातील चालीरीती, पूर्वपरंपरा याची सध्याच्या परिस्थितीशी तुलना करून जे चांगले आहे ते स्वीकारणे आणि ज्याची आता गरज नाही ते सोडून देणे यावर हे अध्यासन मंथन करेल.

### देशातील पहिले अध्यासन केंद्र

१ विद्यापीठाने जागा देऊन समाजाच्या देणगीतून उभारण्यात येणारे हे देशातील पहिले केंद्र आहे. महावीर अध्यासनाची इमारत पूर्णतः इको फ्रेंडली असेल. शेजारील तलावातून येणारे वारे या इमारतीच्या सर्व खोल्यांमध्ये खेळेल अशा पद्धतीने या इमारतीचा आराखडा तयार केला आहे.

२ २००४ साली सुरू झालेल्या अध्यासनामार्फत सध्या प्रमाणपत्र व पदविका कोर्स चालविले जातात. इमारत पूर्णत्वास गेल्यानंतर येथे पीएच.डी.सह विविध कोर्सेस सुरू करण्यात येणार आहेत.

"

महावीर अध्यासनाच्या नव्या इमारतीमधून आंतरराष्ट्रीय दर्जाचे जैन शास्त्रावरील संशोधन करणारे केंद्र निर्माण होणार आहे.

- डॉ. विजय ककडे, संचालक, महावीर अध्यासन केंद्र, कोल्हापूर.

25 APR 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

जागतिक करिअरच्या संधी आपल्या हाताच्या बोटावर...

QR Code

**ऑनलाईन अभ्यासक्रम**

- एम.बी.ए.
- एम.कॉम.
- एम.एस्सी.(गणित)

### ऑनलाईन अभ्यासक्रमांची ठळक वैशिष्ट्ये

- UGC व AICTE मान्यता प्राप्त: राज्यातील First State University.
- प्रवेशापासून ते परीक्षेपर्यंत सर्व काही ऑनलाईन.
- माफक शुल्कामध्ये ऑनलाईन प्रणालीद्वारे अभ्यासक्रम पूर्ण करण्याची सुवर्णसंधी.
- अनुभवी तज्ज्ञांकरवी अभ्यासक्रमाची रचना.
- प्रवेश परीक्षा नाही.
- मार्गदर्शनासाठी पुर्ण वेळ मार्गदर्शकांची उपलब्धता.
- सुसज्ज अशा Learning Management System द्वारे नामांकित विषयतज्ज्ञांनी विकसित केलेले Video Lectures.
- सुलभ व दर्जेदार अभ्यास सुविधा
- ही पदवी इतर कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या Regular / Distance च्या पदवीशी समकक्ष.

अधिक माहितीचा तपशील विद्यापीठ संकेतस्थळाच्या खालील लिंकवर https://online.unishivaji.ac.in/admissions/ उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी ०२३१-२६०९४०९ या क्रमांकावर अथवा cdoe@unishivaji.ac.in या ई-मेलवर संपर्क साधावा.

ऑनलाईन एम.बी.ए. एम.कॉम. व एम.एस्सी.(गणित) करिता पूर्व नोंदणी करण्यासाठी वरील QR Code स्कॅन करा.

जा.क्र. शिवाजी वि/सीडीओई/२२२
दि. २५.०४.२०२५

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव